**म.शि.प्र.मंडळाचे,**

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई

## राष्ट्रीय सेवा योजना

## नियमित कार्यक्रम - २०१७-१८

## अहवाल

1. **योग दिन साजरा :**

दि. 21 जून, 2017 रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने योग दिन साजरा करण्यात आला. या शिबीरास प्राचार्या वनमाला गुंडरे, उपप्राचार्य कांतराव गाडे, डॉ. दिनकर तांदळे, महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते. या शिबीरास योग शिक्षक प्रा. तत्तापुरे जे. जी. यांचे मार्गदर्शन लाभले.

2. **सल्लागार समितीची बैठक :**

"राष्ट्रीय सेवा योजना" विभागाच्या सल्लागार समितीची बैठक प्राचार्य डॉ. व्ही.जी. गुंडरे यांच्या अध्यक्षतेखाली दि. 28.06.2017 रोजी घेण्यात आली. या बैठकीमध्ये "राष्ट्रीय सेवा योजना" यांच्या वतीने राबविण्यात येणाया वार्षिक कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले.

3. दि. 10 जुलै 2017 रोजी "राष्ट्रीय सेवा योजना" मध्ये सहभागी होण्यासाठी महाविद्यालयामध्ये विद्यार्थीसाठी सूचना प्रदर्शित करण्यात आली व ईच्छुक विद्यार्थ्यांकडून अर्जाची मागणी केली. विद्यार्थ्यांकडुन आलेल्या अर्जांची छाननी करून 200 (दोन एकक) स्वंयसेवकांची निवड केली. सदरील यादी रा. से. यो. विभाग विद्यापीठाकडे स्वयंसेवक प्रवेश फी सह सादर केली आहे.

4. **वृक्षारोपण उपक्रम :**

दि. 01 जुलै ते 07 जुलै 2016 या सप्ताहात वृक्षारोपन कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी एकूण 200 वृक्षांची लागवड महाविद्यालय परिसरात करण्यात आली. या उपक्रमात प्राचार्य. डॉ. व्ही. जी. गुंडरे, उपप्राचार्य. प्रा. के. डी. गाडे, कार्यक्रमाधिकारी डॉ. दिलीप भिसे, प्रा. अहिल्या बरुरे व रा.से.यो. विभागातील स्वयंसेकासमवेत महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचा—यांनी सहभाग नोंदविला.





5. **रक्षाबंधन :**

दि. 07 ऑगस्ट 2017 रोजी रा.से.यो. स्वयंसेवक व स्वयंसेविका यांच्या समवेत कार्यक्रमाधिकारी डॉ. दिलीप भिसे, प्रा. अहिल्या बरूरे यांच्या पुढाकाराने अंबाजोगाई शहरातील बोधवर्धनी मतिमंद विद्यालयात रक्षाबंधनाचा सन साजरा करण्यात आला. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांना राख्या बांधुन अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले.





6. **स्वच्छता शिबीराचे आयोजन :**

दि. 14 ऑगस्ट 2017 रोजी महाविद्यालय प्रांगणात 15 ऑगस्ट च्या अनुशंगाने रा. से. यो. विभागाच्या वतीने स्वच्छता अभियान राबवण्यात आले.

7. **स्वच्छता पंधरवाडा :**

दि. 16 ऑगस्ट ते 30 ऑगस्ट 2017 या कालावधीमध्ये यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात प्राचार्या डॉ. व्ही. जी. गुंडरे, यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यक्रमाधिकारी डॉ. दिलीप भिसे, प्रा. अहिल्या बरूरे यांच्या सहकार्याने स्वयंसेवकांसह स्वच्छता पंधरवाडा राबवण्यात आला.





8. **सदभावना दिन :**

दि. 03 सप्टें, 2016 रोजी सदभावनादिन साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. व्ही. जी. गुंडरे यांनी राजीव गांधी यांच्या व्यक्तीमत्वावर प्रकाश टाकला व सदभावना दिनाचे अवचित्य सांगीतले कार्यक्रमधिकारी डॉ. दिलीप भिसे यांनी उपस्थितांना सदभावना दिनाची शपथ दिली. याप्रसंगी व उपप्राचार्य डॉ. डी. आर. तांदळे, प्रा. अहिल्या बरुरे, प्रा. अरविंद घोडके, प्रा. अनंत मरकाळे व स्वयंसेवकाची उपस्थिती होती.

9. **माणुसकीची भिंत :**

दि. 07 सप्टेंबर 2017 रोजी सामाजिक दायित्वाच्या प्रेरणेतुन आमच्या महाविद्यालयात रा.से.यो. विभागाच्या वतीने माणुसकीची भिंत या उपक्रमास प्रारंभ करण्यात आला. याचे उद्घाटक प्राचार्य आर. टी. देशमुख हे होते. याप्रसंगी प्राचार्या डॉ. व्ही. जी. गुंडरे, उपप्राचार्य डॉ. डी. आर. तांदळे, उपप्राचार्य, प्रा. के. डी. गाडे, कविवर्य विश्वंभर वराट, श्री. विद्याधर पांडे, प्रा. अहिल्या बरुरे, प्रा. अरविंद घोडके, प्रा. अनंत मरकाळे व स्वयंसेवक उपस्थित होते.





10. साक्षरता दिन साजरा :

दि. 08 सप्टें, 2017 राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आंतराष्ट्रीय साक्षरता दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वनमाला गुंडरे या कार्यक्रमाच्या अध्यक्षा होत्या. तर श्री. उत्तम जाधव, तहसिलदार बार्शी यांनी प्रमुख अतिथी म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन कार्यक्रमाधिकारी अहिल्या बरूरे यांनी केले तर आभार प्रा. वीर यांनी मांनले. याप्रसंगी डॉ. दिलीप भिसे व डॉ. दिपक भारती यांची प्रमुख उपस्थिती होती.

11. रा.से.यो. दिन साजरा :

24 सप्टेंबर 2017 हा दिवस राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि. 25 सप्टेंबर 2017 रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने शेतकरी आत्महत्या संदर्भात संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी विदर्भातील प्रसिध्द कवि प्रा. ज्ञानेश वाकूडकर, यांच्या गीत व काव्यवाचनाच्या माध्यमातून बळीराजांच्या मुलांना आत्मभान देणारे विचार त्यांनी मांडले, कार्यक्रमाचे प्रास्ताविक . मुकुंद राजपंखे यांनी यांनी केले. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य दिनकर तांदळे हे होते. याप्रसंगी उपप्राचार्य के. डी. गाडे, उपप्राचार्य बी. बी. शिंदे, श्री. अण्णासाहेब खंदारे कार्यक्रमाधिकारी डॉ. दिलीप भिसे व महाविद्यालयातील प्राध्यापक व स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





**12. रेणूकादेवी परिसर स्वच्छता शिबिर :**

अंबाजोगाई परिसरातील रेणूकादेवी हे महत्वाचे आराध्य दैवत. या परिसरात नवरात्र निमित्ताने भाविकांची माठी वर्दळ असते. या धरतीवर दसरा महोत्सव संपताच दि. 01 ऑक्टोंबर 2017 रोजी रा. से. यो. विभागाच्या वतीने स्वच्छता शिबीराचे आयोजन करण्यात आले. मंदिर स्वच्छते सोबतच परिसर स्वच्छता याप्रसंगी करण्यात आले. या शिबीरात कार्यक्रमाधिकारी डॉ. दिलीप भिसे, डॉ. तांदुळजेकर डी. बी., प्रा. अनंत मरकाळे, प्रा. डॉ. रुपेश देशमुख  व स्वयंसेवक उपस्थित होते.





13. महात्मा गांधी व लालबहादुरशास्त्री जयंती :

दि. 02 ऑक्टोंबर 2017 रोजी महाविद्यालयात रा.से.यो. विभागाच्या वतीने महात्मा गांधी व लालबहादुरशास्त्री जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वनमाला गुंडरे यांनी मार्गदर्शन केले.